# “भारताचे संविधान भावी पिढीसाठी समजून घेण्याची गरज” – दिपाली आशा निवास

*सुजन न्यूज*



## “भारताचे संविधान भावी पिढीसाठी समजून घेण्याची गरज” – दिपाली आशा निवास

**“भारताचे संविधान भावी पिढीसाठी समजून घेण्याची गरज” – दिपाली आशा निवास**




**तरडगाव येथे किशोरवयीन युवतींसाठी एकदिवसीय संविधान कार्यशाळा यशस्वी**

फलटण प्रतिनिधी : फलटण तालुक्यातील तरडगाव येथे किशोरवयीन युवतींसाठी एकदिवसीय संविधान कार्यशाळा दिनांक १४ डिसेंबर रोजी अत्यंत उत्साहात पार पडली. या कार्यशाळेला फलटण तालुक्यातील विविध गावांमधील युवतींचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला.

वर्क फॉर इक्वालिटी ही सामाजिक संस्था सन २०१० पासून पुणे जिल्ह्यात लिंगसमभाव, आरोग्य, बालहक्क आणि पर्यावरण या विषयांवर सातत्याने कार्यरत आहे. कमिन्स इंडिया फाउंडेशनच्या सहकार्याने संस्थेचे फलटण तालुक्यातील सुमारे २० गावांमध्ये किशोरवयीन मुले-मुलींसाठी लिंगसमभाव व युवती नेतृत्व विकासाचे कार्य सुरू आहे.

या उपक्रमांतर्गत तरडगाव, चव्हाणवाडी, विठ्ठलवाडी, सासवड, हिंगणगाव, आदर्की खुर्द, मिरगाव, दुधेबावी, नांदल, सुरवडी, तांबवे, काळज, निंभोरे, वाठार निंबाळकर, तिरकवाडी, बरड, विडणी व धूळदेव या गावांतील युवती गटांसाठी हा उद्बोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यशाळेत संविधानाच्या प्रचारक व चांगभलं संस्थेच्या सदस्या दिपाली आशा निवास यांनी भारतीय संविधानाची उद्देशिका उपस्थित युवतींना समजावून सांगितली. उद्देशिकेतील प्रत्येक शब्दाचा अर्थ त्यांनी उदाहरणांच्या साहाय्याने आणि अत्यंत सोप्या भाषेत स्पष्ट केला.

कार्यशाळेत प्रामुख्याने

अ) नियमांची गरज

ब) संविधान निर्मिती प्रक्रिया

क) उद्देशिकेचा दैनंदिन जीवनाशी असलेला संबंध

ड) महिला सक्षमीकरण व नेतृत्व

या विषयांवर विशेष भर देण्यात आला.

या कार्यशाळेत ६५ किशोरवयीन मुली तसेच वर्क फॉर इक्वालिटी संस्थेच्या ११ महिला किशोरी सखी सहभागी झाल्या. खेळ, गीते आणि संवादात्मक पद्धतीचा वापर करत दिपाली ताईंनी संविधान विषयक माहिती सहजपणे युवतींपर्यंत पोहोचवली.

या कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या अध्यक्षा प्रभा विलास व श्री. मनोज सकटे यांच्या मार्गदर्शनाखाली राजश्री रासकर, उर्मिला चव्हाण, सोनल मोरे, रेखा जगताप व किशोरी सखी यांनी संयुक्तपणे केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन सौ. राजश्री रासकर यांनी केले.